महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!



महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअॅप करा.



महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६ वा | दिनांक : ३०/०९/२०२४ | वार : सोमवार


## सरकारला मराठा समाजाला आरक्षण द्यावे लागेल, मनोज जरांगेंचा अमित शहांवर निशाणा



**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्र दौऱ्यावर असताना आम्ही अनेक आंदोलने हाताळली आहेत. त्याप्रमाणे राज्यातील मराठा आंदोलनही व्यवस्थित हाताळू, असे म्हटले होते. यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अमित शाह यांचा खरपूस समाचार घेतला आहे. सरकारला मराठा समाजाला आरक्षण द्यावे लागेल. तुम्ही मराठा समाजाला आरक्षण दिले, तर तुम्हाला सत्ता मिळवण्यापासून कुणीही रोखू शकणार नाही.

पण मराठ्यांना बाजुला ठेवले तर तर ती तुमची घोडचूक असेल. मराठ्यांच्या पाठिंब्याविना कोणीही सरकार स्थापन करू शकत नाही, असा इशारा जरांगे यांनी दिला आहे.

मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे रुग्णालयात उपचार घेत आहेत. रविवारी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी मनोज जरांगे म्हणाले की, अमित शाह आणि देवेंद्र फडवणीस याना मराठ्यांना आरक्षण द्यावे लागेल. धनगर आणि धनगडचा आदेश काढणार असाल, तर मराठा आणि कुणबी एकच आहेत, असा आदेशही काढायला काहीच हरकत नाही. हा आदेश निवडणुकीआधीच काढावा, असे ते म्हणाले.

अमित शहांना कत्तली करायच्या आहेत का? पुढे बोलताना जरांगे म्हणाले की, राज्यात प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे भाजप वाढली. त्याआधी राज्यात भाजप नव्हते. तुमच्यासोबत काम करणाऱ्यांना उद्धव ठाकरेंना तुम्ही दूर लोटले आणि एका बांगलादेशी बाईला देशात आणले.

अमित शहा यांना कत्तली करायच्या आहेत का? असा सवालही जरांगे यांनी अमित शहा यांना केला आहे. पुढे ते म्हणाले की, यांना दादागिरी करून सत्ता मिळवायची आहे. पण जनतेने राजकीय एन्काउंटर केला, तर तुम्ही दिसणार नाही, अशा शब्दांत जरांगेंनी टीका केली आहे.

छगन भुजबळांना सवाल

मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्या वक्तव्यावरही भाष्य केले. भुजबळ यांच्या आवाहना प्रमाणे आम्ही निवडणुकीत जागा निवडून आणल्या, तर ते त्यांचे आरक्षण सोडून मराठा समाजाला आरक्षण देतील का? ते राजकारण सोडतील का? गोरगरिबांचा करत असलेला विरोध, जातीय तेढ निर्माण करणारी वक्तव्ये बंद करणार का?,

मराठ्यांना ओबीसी कोट्यातून आरक्षण असतानाही तुम्ही त्याला विरोध करत आहात. हे सर्व तुम्ही थांबवणार का? असे अनेक प्रश्न मनोज जरांगे यांनी यावेळी केले.

## ठाकरे गटाच्या आक्रमक शिवसैनिकांमुळे पोलिसांनी नीतेश राणेंना मागच्या दाराने बाहेर नेले



**नागपूर :** दौऱ्यावर असलेल्या शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या स्वागतासाठी शेकडो शिवसैनिक विमानतळावर गोळा झाले असताना दुसरीकडे भारतीय जनता पक्षाचे आमदार नीतेश राणे अमरावती जिल्ह्यात अचलपूरला जाण्यासाठी दुपारी नागपूरला विमानाने पोहचले. राणे नागपूर विमानतळावर उतरल्यानंतर प्रवेशद्वाराच्या बाहेर उभे असलेल्या ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांना दिसताच शिवसैनिक संतप्त झाले व त्यांनी राणेंच्या विरोधात आक्रमक होत जोरदार घोषणबाजी केली. दरम्यान गोंधळ टाळण्यासाठी पोलिसांनी राणे यांना मागच्या प्रवेशद्वारातून बाहेर काढले व गाडीमध्ये बसवून रवाना केले. अचलपूरला आयोजित करण्यात आलेल्या सकल हिंदू संमेलनाच्या निमित्ताने नितेश राणे रविवारी दुपारी नागपुरात पोहचले.

दरम्यान कळमेश्वर येथील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उद्धाटनासाठी उद्धव ठाकरे नागपुरात येणार असल्यामुळे त्यांच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात शिवसैनिक विमातळावर गोळा झाले होते. गेल्या काही दिवसांपासून वादग्रस्त वक्तव्यावरून चर्चेत असलेले नीतेश राणे विमानतळावरच्या बाहेर येत असल्याचे कळताच ठाकरे गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आणि त्यांच्या विरोधात घोषणाबाजी सुरू केली.

पोलिसांच्या बंदोबस्तात राणे विमानतळाच्या बाहेर

नीतेश राणे यांच्या स्वागतासाठी केवळ दहा ते बारा कार्यकर्ते बाहेर उभे होते. राणे बाहेर येत असताना पोलिसांनी त्यांना प्रारंभी आतमध्ये थांबण्यास सांगितले. परंतु, शिवसेनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले असल्याने पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, राणे यांना दुसऱ्या मार्गाने बाहेर काढण्यासाठी नियोजन केले. मात्र शिवसैनिकांना माहिती पडताच शेकडो शिवसैनिक त्या प्रवेशद्वाराकडे धावले आणि तिथे जाऊन त्यांनी घोषणाबाजी सुरू केली. पोलिसांनी कार्यकर्त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र ठाकरे गटाचे कार्यकर्ते काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. शेवटी मात्र पोलिसांच्या बंदोबस्तात राणे यांना विमानतळाच्या बाहेर काढले गाणि गाडीमध्ये बसून विमानतळावरुन रवाना केले.

घोषणाबाजीचा मला फरक पडत नाही

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाने मला कुठेही जाण्याची आणि सभा घेण्याचा अधिकार दिला आहे. मी ठाकरे गटावर टीका करीत राहाणार आहे. त्यांच्याकडे आता घोषणा देणे एवढेच काम उरले आहे. त्यांचा तेवढाच जीव राहिलाय. जी काही वाचलेली शिवसेना आहे. ती बंटी- बबली ( संजय राऊत, उद्धव ठाकरे) यांना खुश करण्यासाठी या घोषणा देत आहे. मात्र मला काही फारक पडत नाही, असे भाजप आमदार नीतेश राणे म्हणाले.

ठाकरे गटाचा पदाधिकाऱ्यांनी दाखवून दिला

घोषणा देणारे शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी होते. गेल्या काही दिवसांपासून राणे ठाकरे गटातील नेत्यांबाबत वादग्रस्त वक्तव्य करीत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांचा राणे यांच्या विरोधात संताप व्यक्त केला आहे. ठाकरे गटाचा आणि खऱ्या शिवसैनिकांचा जोश काय असतो, हे आमच्या पदाधिकाऱ्यांनी दाखवून दिले आहे, असे ठाकरे गटाचे नेते व आमदार भास्कर जाधव यांनी सांगितले.

## बाप मुख्यमंत्री आणि मुलगा उपमुख्यमंत्री



**चेन्नई :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी त्यांचा मुलगा उदयनिधी स्टॅलिन यांना उपमुख्यमंत्री बनवले आहे. यासोबतच मंत्रिमंडळातही फेरबदल करण्यात आले. व्ही सेंथिल बालाजी, आर राजेंद्रन, डॉ. गोवी चेझियान आणि एसएम नासर यांना स्टॅलिन सरकारमध्ये मंत्री करण्यात आले आहे.

रविवारी, राज्यपाल आरएन रवी यांनी राजभवनात सेंथिल बालाजी यांच्यासह द्रमुकच्या चार नेत्यांना शपथ दिली. सेंथिल बालाजी स्टॅलिन मंत्रिमंडळात परतले आहेत. मनी लाँड्रिंग प्रकरणात अटक झाल्यानंतर त्यांनी यावर्षी फेब्रुवारीमध्ये राजीनामा दिला होता. २७ सप्टेंबर रोजी त्यांना सुप्रीम कोर्टातून जामीन मिळाला होता.

राज्य सरकारमध्ये आधीच मंत्री असल्याने उदयनिधी यांनी शपथ घेतली नाही. सरकारने मंत्रिमंडळात त्यांचा दर्जा वाढवला आहे. त्यांना यापूर्वीच उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले होते. उदयनिधी हे गेल्या वर्षी सनातन धर्मावरील वक्तव्यामुळे चर्चेत आले होते. त्यांनी सनातन धर्माची तुलना डेंग्यू-मलेरियाशी केली होती.

तामिळनाडूमध्ये ही दुसरी वेळ आहे, जेव्हा वडील मुख्यमंत्री आणि मुलगा उपमुख्यमंत्रीपद भूषवत आहेत. यापूर्वी २००९-११ मध्ये विद्यमान मुख्यमंत्री एमके स्टॅलिन हे उपमुख्यमंत्री होते. त्यांचे वडील दिवंगत एम करुणानिधी त्यावेळी मुख्यमंत्री होते. उदयनिधी हे त्यांचे आजोबा आणि वडिलांनंतर राज्य सरकारमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे त्यांच्या कुटुंबातील तिसऱ्या पिढीतील नेते आहेत.

उपमुख्यमंत्री उदयनिधी यांच्याकडे आणखी एका खात्याची जबाबदारी उदयनिधी स्टॅलिन यांना त्यांच्या विद्यमान युवक कल्याण आणि क्रीडा विकास मंत्रालयाव्यतिरिक्त नियोजन आणि विकास मंत्रालयाचा कार्यभार देण्यात आला आहे. बालाजी यांना कोणते मंत्रिपद दिले जाणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

ईडीने १४ जून २०२३ रोजी बालाजी यांना अटक केली होती. त्यावेळी ते राज्य सरकारमध्ये ऊर्जामंत्री होते. याशिवाय उत्पादन शुल्क व दारूबंदी खातेही त्यांच्याकडे होते. ते १५ महिने तुरुंगात राहिले. मनी लॉंड्रिंग प्रकरणात २७ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने बालाजी यांना जामीन मंजूर केला.

उदयनिधी म्हणाले होते- सनातन धर्म हा डेंग्यू-मलेरियासारखा उदयनिधी स्टॅलिन यांनी 3 सप्टेंबर 2023 रोजी विधान केले होते. त्यांनी सनातन धर्माची तुलना डेंग्यू, मलेरिया आणि कोरोनाशी केली. डास, डेंग्यू, ताप, मलेरिया आणि कोरोना या अशा काही गोष्टी आहेत ज्यांना केवळ विरोध करता येत नाही, तर त्यांचा नायनाट करणे आवश्यक आहे, असे उदयनिधी म्हणाले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० सप्टेंबर २०२४


## आरोपी गोळीबार करतो, मग पोलिसांनी बंदूक शोकेसमध्ये ठेवायची का? - एकनाथ शिंदे



**पुणे :** विरोधकांना दोन्ही बाजूंनी बोलायची सवयच आहे. बदलापूर प्रकरणात आधी म्हणत होते. आरोपीला भरचौकात फाशी द्या. आता आरोपीने पोलिसांवरच गोळीबार केला तर पोलिसांनी बंदूकी शोकेसमध्ये ठेवायच्या का, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे मेट्रोच्या उद्घाटन प्रसंगी मविआला लगावला आहे.

सीएम एकनाथ शिंदे म्हणाले की, पुणे मेट्रोचा कार्यक्रम खरेतर गुरुवारी होणार होता. परंतू पावसामुळे उद्घाटन होऊ शकले नाही. सर्वकाही तयारी होती. परंतु लोकांना त्रास होईल म्हणून पंतप्रधानांनी स्वत: हा कार्यक्रम पुढे ढकलण्याची विनंती केली.परंतु विरोधक दोन्ही बाजूंनी बोलतात. आम्ही करतो उद्घाटन असे विरोधक बोलू लागले. दोन्ही बाजूंनी बोलतो चालतो त्याला काय म्हणतात? असा सवाल करत विरोधकांवर निशाणा साधला आहे.

नेमके सीएम काय म्हणाले?

एकनाथ शिंदे म्हणाले की, बदलापूर प्रकरण घडल्यानंतर आरोपीला फाशी द्या, असं विरोधक म्हणत होते. त्यानंतर आरोपी जेव्हा गोळीबार करतो तेव्हा पोलिसांनी बंदूक शोकेसमध्ये ठेवायची का? पोलिसांनी समजा ते केलं नसतं तर विरोधकच म्हणाले असते की चार लोक असून आरोपी गोळीबार करून पळून गेला. मग पोलिसांची बंदूक काय शोसाठी ठेवली का? म्हणजे विरोधक इकडून पण बोलतात आणि तिकडूनही बोलतात

योजनेत खोडा घालणाऱ्यांना बहिणीच जोडा दाखवतील

एकनाथ शिंदे म्हणाले की, लाडक्या बहीण योजनेत खोडा घालणाऱ्यांना बहिणी जोडा दाखवतील. या योजनेचा राज्यातील लाडक्या बहिणींच्या कुटुंबांना हातभार लागणार आहे. लाडक्या बहिणींच्या संसाराला हातभार लावण्यासाठीची ही योजना आहे. ही योजना बंद होणार नाही म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनांना विरोध करणाऱ्यांवर टीकास्त्र डागले.

## पाककला स्पर्धेचे आयोजन




**छत्रपती संभाजीनगर :** दरवर्षी जागतिक आरोग्य संघटना तर्फे राष्ट्रीय पोषण सप्ताह साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी वेगळी थीम असते. याचेच औचित्य साधून गृहविज्ञान विभागाने नुकतेच राष्ट्रीय पोषण महा अंतर्गत दिनांक २७ सप्टेंबर रोजी आरोग्यदायी पौष्टिक नाश्ता पाककृती या थीमवर लक्ष केंद्रित करून पाककलेचे आयोजन केले.

दिवसाची सुरुवात आरोग्य दायी व प्रसन्न झाली तर पूर्ण दिवस उत्साहवर्धक जातो दिवसाची सुरुवात पौष्टिक नाष्ट्याने व्हावी या अनुषंगाने ही थीम ठेवण्यात आली.

यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला नाविन्यपूर्ण आणि पौष्टिक पदार्थ तयार करून त्यांचे पाककौशल्य दाखवले काही उत्कृष्ट पाककृतीमध्ये व्हेजिटेबल लॉलीपॉप, आटा मोमोज, विविध प्रकारचे अप्पे, ओट्स पिझ्झा, हर्बराईस, अंकुरित कडधान्य उपमा, चटपटा चना, नाविन्यपूर्ण पराठे आणि थालीपीठ, हिरव्या मुगाचा डोसा, उपवासाची थालीपीठ यांचा समावेश होता या कार्यक्रमात संतुलित आणि पौष्टिक नाश्त्यावर भर देण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून आहार तज्ञ श्रीमती मंजू मंठाळकर या होत्या त्यांनी पौष्टिक नाश्ता कसा असावा, पौष्टिक नाश्त्याचे रोजच्या जेवणातील महत्त्व व गरज याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्यांनी ब्रेकफास्ट या शब्दाचा अर्थ उलगडून सांगितला तसेच प्रथिनेयुक्त नाष्टा आणि चांगली लाइफस्टाईल कशी असावी यांच्या बद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गृह विज्ञान विभागाच्या प्रमुख डॉ. अन्विता अग्रवाल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व विद्यार्थ्यांना आहाराच्या विविध पैलू बाबत माहितीपण दिली.

कार्यक्रमाच्या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या डॉ.मीनल श्रीगिरीवार उपस्थित होत्या.डॉ. नेत्रा शेळके, प्रा.वर्षा पाईकराव, डॉ. शिला जिरे, डॉ.प्रतिभा धोंडकर, प्रा.विशाखा जोशी यांनी कार्यक्रमात सहकार्य केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा मंगल मोरे यांनी केले.

## महाराष्ट्राचा ७/१२ अदानीच्या नावे करणार का? - विजय वडेट्टीवार

**चंद्रपूर :** जिल्ह्यातील घुग्घुस येथील माऊंट कार्मेल कॉन्व्हेंट शाळेचे व्यवस्थापन अदानी फाऊंडेशनकडे सोपविण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे विरोधक आक्रमक झाले असून आता महाराष्ट्राचा ७/१२ च अदानीच्या नावे करणार का, असा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारला केला आहे. यासंदर्भात सोशल मीडियावर एक पोस्ट करत त्यांनी महायुती सरकारला धारेवर धरले आहे.

विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियावर शासन निर्णयाची प्रत शेअर करत सरकारला जाब विचारला आहे. महाराष्ट्राला महायुती सरकार एवढाच धोका अदानीचा देखील आहे. एअरपोर्ट, वीज, धारावी, मुंबईतील जमिनी झाल्या आता शाळांवर पण अदानींचा डोळा आहे. महायुती सरकारने संपूर्ण महाराष्ट्राचा 7/12 च अदानी अँड कंपनीला द्यायचा ठरवले आहे का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी या पोस्टमध्ये केला आहे.

शाळांमध्ये गौतम अदानीचा फोटो लावण्याची तयारी सुरू

शाळेच्या भिंतीवर आदराने आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी लावलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमांसोबत आता गौतम अदानी यांचा पण फोटो लावायची तयारी शिंदे, फडणवीस आणि अजित पवार सरकारकडून सुरू झाली आहे, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

महाराष्ट्राची अस्मिता गुजरातकडे गहाण

विजय वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्रातील विमानतळे अदानीला देण्यात येत आहेत. राज्यातील बंदरे अदानीला दिली जात आहेत. कोट्यवधी रुपयांची प्राइम जमीन आणि रेल्वे दिली जात आहे, केवळ शाळा बाकी होत्या, आता त्या देखील अदानीला दिल्या जात आहेत. शिक्षणाचे खासगीकरण करून आता शाळांमध्ये संघाचे विचार शिकवले जाणार, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. महाराष्ट्राचा ७/१२ अदानीच्या नावे करावा अशी सरकारची मंशा आहे. असा आरोपही वडेट्टीवार यांनी केला. आता महायुती सरकार महाराष्ट्राच्या अस्मितेला गुजरातकडे गहाण ठेवण्याचे काम केले आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेसोबत खेळणाऱ्यांना सत्ताधाऱ्यांना त्यांची जागा दाखवायची गरज आहे, असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.

## रोहित पवारांच्या डोक्यात ५० टक्के शेण भरलेले : अमोल मिटकरी





**अकोला :** आगामी विधानसभा निवडणुकीत अजित पवार गटाचे १० ते १२ आमदार निवडून येणार नाहीत, असे वक्तव्य आमदार रोहित पवार यांनी केले होते. या वक्तव्यावरून अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी रोहित पवारांचा समाचार घेत जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. रोहित पवार यांच्या डोक्यात ५० टक्के शेण भरले असल्यामुळे ते बालिशपणाने बोलतात, अशी जहरी टीका अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे.

अमोल मिटकरी म्हणाले की, रोहित पवार यांच्या डोक्याची तपासणी केल्यानंतर त्यात शेण आणि किडे भरलेली दिसतील. त्यामुळे ते वेड्याप्रमाणे बालिश वक्तव्य करत आहेत. लाडकी बहीण योजनेला महिलांची पसंती मिळत असल्यामुळे त्यांच्या मेंदूतील किडे वळवळले आहेत. त्यामुळे ते काहीही बोलत आहेत, त्यामुळे अशा मूर्खांबद्दल बोलणे मला योग्य वाटत नाही, अशी टीकाही मिटकरी यांनी केली आहे.

रोहित पवारांची अजित पवारांवर बोलण्याची लायकी नाही

रोहित पवारांनी आमच्या पक्षाची काळजी करू नये. त्यांनी आधी स्वत:ची लायकी काय आहे हे तपासून पहावे. त्यांच्यात जातीय अहंकार आणि मस्तवालपणा भरलेला आहे. त्यामुळे त्यांची अजित पवारांवर बोलण्याची लायकी नाही. अजित पवारांवर टीका करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे आहे, असेही आमदार अमोल मिटकरी यांनी म्हटले आहे. तसेच रोहित पवारांनी त्यांच्या पक्ष वाढीसाठी आपल्या तोंडाचा पट्टा चालवावा, असा सल्ला देखील अमोल मिटकरींनी दिला आहे.

यामुळे रोहित पवारांवर साधला निशाणा

रोहित पवार २०१९ मध्ये कर्जत-जामखेड मतदारसंघातून पहिल्यांदाच विधानसभेवर निवडून आले आहेत. यंदा पुन्हा त्यांनाच महाविकास आघाडीकडून तिकीट मिळणार असल्याचे बोलले जात आहे. अजित पवार हे शरद पवारांसोबत बंड करून राष्ट्रवादीतून बाहेर पडल्यामुळे रोहित पवार यांनी त्यांना सातत्याने लक्ष केले आहेत. रोहित पवार अजित पवारांवर टीका करण्याची कोणतीही संधी सोडत नाहीत. यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी रोहित पवारांचा समाचार घेतला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanashaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० सप्टेंबर २०२४

# पुस्तक परीक्षण : भयानक वास्तविकतेचा कलात्मक आविष्कार ('फुटूच लागतात पंख') श्रध्दा गुजराथी- शहा






डॉ. सुधीर देवरे यांचे 'फुटूच लागतात पंख' व 'भंग अभंग' हे दोन कवितासंग्रह एकाच वेळी प्रकाशित होताच मी ते तात्काळ मागवून घेतले. पैकी 'फुटूच लागतात पंख' एका बैठकीत वाचला. पुन्हा पुन्हा वाचाव्या अशा या सगळ्याच अप्रतिम कविता. १९८० ते २०२१ पर्यंतच्या चाळीस वर्षांतील त्यांच्या निवडक कविता या दोन्ही संग्रहात समाविष्ट आहेत. कुठे कुठे काही सुट्या कविता याआधी वाचनात आल्या असल्या तरी बऱ्याच न वाचलेल्या आणि समग्र स्वरूपात या अर्थपूर्ण कविता नव्याने वाचनात आल्या. प्रत्येक कवितेचा अर्थ थेट जीवन संघर्षाशी निगडीत असून तो आत खोलवर भिडत राहतो.

कवितासंग्रहाच्या सुरुवातीला कवीने समर्पित ओळी लिहिल्या आहेत, "जगातील अशा सगळ्या रस्त्यांना की जे भर दिवसा चांदण्या मोजत चालू देत नाहीत." ह्यावरही मी खूप चिंतन केले. माझ्या मते याचा अर्थ असा असू शकतो, की निंदा करणारे रस्त्यातले लोक आपल्याला गर्व करू देत नाहीत. अथवा आपण आपल्या तात्विक विचारधारेत असलोत तरी ते विचार इतके गजबजलेले असतात की आपण अजानता इतरत्रही भरकटत जातो, विचार सरळ ओळीत मांडता येत नाहीत. आपले विचार प्रकट करु शकत नाही की कोणाला उघडपणे दुखवूही शकत नाही. अथवा कोणतेही यश आपल्याला सहज मिळवता येत नाही, त्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो. वगैरे.

या कवितांचेही तसेच. रसिक अधांतरीत हवेत तरंगत कवितांचा आस्वाद घेत तल्लीन होत राहतो. अनेक ठिकाणी ठेचकाळतो. काही जागा बऱ्याच गूढ म्हणून अर्ध्यावर सोडून देतो. समजणाऱ्या कवितांतून विविध अनुभूतीच्या भावना प्रकट होत असल्याचा अनुभव आपल्याला मिळत जातो. कविता ही शब्दांची जादू असते ह्याचा प्रत्यय येतो. थोडक्यात पण खूप सारे जीवन चिंतन, सौंदर्य, अनुभव आणि शब्दांची शक्ती म्हणजे कविता असते, असे मला वाटते. हे सगळे मला या संग्रहात दिसले.

"फुटूच लागतात पंख" या कवितासंग्रहात एकूण १७५ कविता समाविष्ट आहेत. प्रत्येक कविता ही अर्थपूर्ण सौंदर्याने अलंकृत, नटलेली आणि वाचनीय आहे. "रस्ता किती मायाळू, रस्त्यांच्या दिशांची हमी, खणत जातो खोल, पुढं सरकता येत नाही" या कविता आयुष्याचे सुंदर, खरे आणि भयानक रूप दाखवून जातात. आयुष्यात ज्या जागा सुख देत असतात त्यांच्यावर आपण प्रेम करुन तिथेच अडकून बसतो आणि त्यात आपले आयुष्य कसे भरकटून घेतो, हे या कवितांच्या माझ्या आस्वादात प्रकर्षाने जाणवले. "माणूस गेला कुठे" या कवितेत आपण इंटरनेट, टिव्ही आणि इतर सुखसोयींच्या वस्तू घरात आणूनच नव्हे तर वागण्याबोलण्यातून, कृतीतून माणूसपण कसे विसरून चाललोत, याचे चित्रण घडते. "दगडाला देव्हारा, पागल, असली लपविण्यात, वेळ जात नाही म्हणून" या कविता रोजचे ऐहीक जीवनदर्शन घडवितात. 'वेळ जात नाही म्हणून संस्कृतीच्या गप्पा मारण्या'त पटाईत असलेल्यांच्या जीवनातली पोकळी दिसत राहते.

"म्हातारा उचलायचा कोणी" ही कविता सार्वत्रिक सत्य आहे. माणूस अकारण आपल्याला विशेष आणि 'कोणीतरी वेगळा' समजत असतो, पण ते आपले निश्चितपणे अध:पतनच असते, अशा निष्कर्षाचे या कवितेचे माझे रसग्रहण आहे. "देवाचा बाप" या कवितेत तर मनुष्याने देवाला जन्माला कसे घातले याचा रोखठोक हिशोब कवीने मांडला आहे. मनुष्यानेच देव निर्माण करून देवाला आपल्या सोयीनुसार राबवले आहे, स्थापना केलेली आहे आणि त्याच्याच घंटानादात देव कसा मुका, बहिरा, आंधळा आहे याचे वर्णन केले आहे.

'३१ डिसेंबर, मीरा तरी किती, क्रांतीसाठी रात्री, पंख गळून गेले तरी, हिसकत रहाते हाव' आदी कवितांत जीवनवादाचे दर्शन घडते. 'सळसळती धस, कुजक्या वासाच्या अमरधामात, सहाव्या सुखाचा खटाराही, विंचरून काढाव्या खोल' आदी कवितांत जीवनातली भयानकता आणि विद्दपता दिसून येते. 'प्लास्टिकच्या रोपांची सजावट, कोस, सोंग, उंदीर कैलासवासी, कृष्णाची चूळ, करुणानिधी' आदी कवितांत करूणा, दयनियता, वास्तवता निदर्शनास येत राहते. 'डोळ्यात सोसत, फटीचर, अंतर्मुख, फुलराणी, आपण वगळता, माती मनात म्हणते, गाभारा' आदी कविता रसिकाला अंतर्मुख करून सोडतात. ह्या सगळ्याच कविता भयानक वास्तविकतेचा प्रत्यय देणाऱ्या कलात्मक आविष्कार आहेत.

कवीची अगतिकता त्यांच्या "दहशतवाद" या कवितेत विलक्षणतेने रेखाटली गेली आहे. जगताना इतरांच्या हालचालींवर-क्रियांवर माणसाला लक्ष देत राहणे भाग असते. कोणाकडूनही धोका पोहचू शकतो याची कायम धाकधूक मनात असणे आदी भयावह जीवन दर्शन. 'फुटूच लागतात पंख, पोचवायला गेलेले लोक, आपण सती जात राहतो, रानातल्या थंडीत, नाग निघाला असा ग बाई, माझं वाळवंट भाळ, दंश, राजा आदी कवितांतून आपल्यातला रसिक नव्याने जन्म घेत राहतो, इतका हा काव्यप्रवास थक्क करणारा आणि दमवून टाकणारा आहे.

'आरसा, वीज, भवानी, अंधाराच्या बोटावर, वंश, असा लिहितोस काय, जयांचियासाठी, घरात पाणी असूनही, चमत्काराशिवाय, निसर्गाविरूध्दही अनुदानाची सोय, देव सर्वमान्य झाला, अशाने काय मिळतं, कविता मला सापडते, धर्म सलामत तो..., निवडीचं स्वातंत्र्य' आदी सगळ्याच कविता जीवनसार आहेत. "कोळी किडा" ही कविता तर जीवनातल्या हिंसेचं रूपक ठरावं अशी अप्रतिम! जसे की कोळी किडा हा उंट, वाघ, सिंह खावू शकत नाही पण माशी, पतंग, डास खावू शकतो, पचवू शकतो. म्हणूनच कमकुवत लोक कायम बदमाशांची शिकार होत राहतात.

कवी सुधीर देवरे सर आपल्या कवितांमध्ये एक प्रकारे माणुसकीचे नाते, प्रेम, क्रूरता, भयानकता, एकमेकाला संपवण्याचे राजकारण आदी वास्तवपट समग्रपणे मांडत आहेत. मानव साम्राज्य की दानव साम्राज्य, अशा शंका आपल्या काव्यातून कलात्मकतेने उपस्थित करत राहतात. कवी माणसावर तुटून पडतो- कवितेच्या शस्त्राने कवी माणसातल्या दानवाला घायाळ करतो. या कवितांमध्ये अनेक गुढ अर्थ दडलेले आहेत, ते सगळेच सहजपणे आकलनाला मर्यादा येतात. जे कलात्मक, सौंदर्यपूर्ण, अलंकारिक असूनही अभिधात व्यक्त झाल्यासारखे वाटतात. म्हणूनच वरवर सोपी वाटणारी ही अवघड कविता आहे. मला जितकी समजली तितकी मी इथे व्यक्त झाली आहे. कवीचे शब्द करूणेच्या ओलाव्यात परस्पर्श करतात, विचार करायला भाग पाडतात.

खूप सुंदर, अप्रतिम आणि प्रेरणादायी या कविता आहेत. खलील मोमीन यांचे मुखपृष्ठही अप्रतिम.

**पुस्तक : फुटूच लागतात पंख**
**कवी : सुधीर राजाराम देवरे**
**मुखपृष्ठ : खलील मोमीन**
**प्रकाशक : सहित प्रकाशन, गोवा**
**पृष्ठ संख्या : १७५**
**किंमत : २०० रुपये**

**श्रध्दा गुजराथी- शहा**
**(मोबा. ७५८८६१८८५७)**

# प्रा. तुकाराम जाधव यांना पीएच.डी. पदवी प्रदान...




**सोनई :** मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. तुकाराम भिवसेन जाधव यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची शिक्षण क्षेत्रात सर्वोच्च समजली जाणारी पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. त्यांनी **'अहमदनगर जिल्ह्यातील भटक्यांची जीवनशैली व लोकसाहित्य'** या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. त्यांना चेतना वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. अरुण कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शंकर लावरे सर आणि उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव झिने सर यांनी डॉ. तुकाराम जाधव यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला तसेच भुगोल विभाग, गणित विभाग, राज्यशास्त्र विभाग आणि मराठी विभाग यांच्या अंतर्गतही त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल मुळा एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष मा. खासदार यशवंतरावजी गडाख साहेब, उपाध्यक्ष सन्माननीय उदयन दादा गडाख, संस्थेचे सचिव उत्तमरावजी लोंढे सर, सहसचिव डॉ. विनायक देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर लावरे, उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव झिने, डॉ.अशोक तूवर, डॉ. संभाजी दराडे, डॉ. अविनाश साळवे, डॉ. हरिश्चन्द्र सडेकर, डॉ.संदीप खेडकर, डॉ.सीताराम रौदळ, प्रा.बाळासाहेब शिंदे, डॉ. बाळासाहेब खेडकर, डॉ. जगदीश सोनवणे, डॉ. राजेश वाघ, डॉ. रवींद्र खंदारे, डॉ. मिलिंद वाव्हळ, साहिल कॉम्प्युटरचे समन्वयक इरफान इनामदार, प्रा.शरद औटी, प्रा. योगेश साळवे आदींसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर सेवक यांनी डॉ. तुकाराम जाधव यांचे अभिनंदन केले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: ww.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ३० सप्टेंबर २०२४


## शिंदे आणि फडणवीस मोठा विषय नाही - नाना पटोले



**मुंबई** : आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आम्ही महाविकास आघाडी म्हणून एकत्र सामोरे जाणार आहोत. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रासाठी काही मोठा विषय नाही. महायुतीकडे चेहरा तरी आहे का? हा केवळ खोक्यांचा चेहरा असल्याची सडकून टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

नाना पटोले यांनी बोलताना विविध मुद्द्यांवर भाष्य केले. यावेळी बोलताना त्यांनी शिंदे फडणवीस सरकारवर कडाडून हल्लाबोल केला. त्यांनी सांगितले की, उद्यापासून आमच्या महाविकास आघाडीच्या मॅरेथॉन बैठका होणार आहेत. त्यामध्ये आम्ही जागावाटप संदर्भामध्ये ठरवणार आहोत. अल्पसंख्यांक उमेदवार द्यायचा की नाही निर्णय तेव्हाच घेऊ असेही ते म्हणाले.

दरम्यान, बदलापूर घटनेवर नाना पटोले यांनी भाष्य केले. पटोले म्हणाले की, या सरकारची आता कीव येऊ लागली आहे. यांचं राज्यकारण करायचं नाही याचं भान आम्हाला आहे. सत्तेतील लोक मात्र राजकारण करत आहेत. गुन्हेगार शिंदे, खासदार शिंदे, मारणारा शिंदे, मुख्यमंत्री शिंदे या सगळ्या प्रकरणांमध्ये शिंदे दोषी कसे अशी खोचक विचारणा नाना पटोले यांनी केली. ते पुढे म्हणाले की महाराष्ट्रामध्ये विविध घटना घडल्या आहेत.

देवेंद्र फडणीसांच्या राज्यातही घटना घडल्या आहेत. यांना साधी लाज देखील वाटत नाही. यावर ते राजकारण करत आहेत. एन्काऊंटर झाला की आत्महत्या झाली याबाबत प्रकरण हायकोर्टामध्ये आहे. असे अनेक कॉन्ट्रॅक्टवर कर्मचारी रुजू केल्याची टीका त्यांनी केली. खऱ्या आरोपीला मदत करण्यासाठी माझ्या मुलाला मारले गेल्याचा आरोप आई-वडिलांनी केला असल्याचे नाना पटोले म्हणाले. ही घटना एकनाथ शिंदे आणि आणि देवेंद्र फडणवीस लपवत आहेत. जे दोषीत आहेत त्या सगळ्यांचे एन्काऊंटर करा अशी मागणी नाना पटोले यांनी केली.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## पुण्यातील कार्यक्रमात मंत्री सामंतांचा मोबाईल हरवला

**पुणे** : येथे मेट्रो मार्गिकेच्या उद्घाटन कार्यक्रमादरम्यान राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांचा मोबाईल हरवला. या प्रकारावरून विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. मंत्र्यांची सुरक्षा किती रसातळाला गेली, याचे हे उत्तम उदाहरण आहे, अशी टीका अंबादास दानवे यांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पुण्यातील मेट्रो मार्गिकेचे उद्घाटन पार पाडले. या कार्यक्रमाला उद्योग मंत्री उदय सामंत यांनी उपस्थिती दर्शवली होती. दरम्यान, या कार्यक्रमात त्यांचा मोबाईल हरवला.

यानंतर त्यांच्या मोबाईलसाठी अनाउंन्समेंट करावी लागली. मंत्री उदय सामंत यांचा मोबाईल हरवला आहे. कोणाला सापडल्यास व्यासपीठावर आणून द्यावा, अशी अनाउन्समेंट करण्यात आली. या प्रकारावरून अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सरकारला टोला लगावला आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002


## भाड्याच्या घरात राहते विद्या बालन



**मुंबई** : बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालन दिवाळीत 'भूल भुलैय्या ३' या सिनेमातून पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या सिनेमाचा नुकताच टीझर प्रदर्शित झाला असून विद्या पुन्हा मंजुलिकाच्या भूमिकेत दिसणार आहे. २००७ साली आलेल्या 'भूल भुलैय्या' या सिनेमात विद्या अक्षय कुमारसोबत मुख्य भूमिकेत झळकली होती.

२०१२ मध्ये आलेल्या 'द डर्टी पिक्चर' या सिनेमाने विद्याला मोठं यश मिळवलं आणि ती अधिक लोकप्रिय झाली. त्यानंतर आलेल्या 'कहानी' सिनेमातील सशक्त अभिनयाने विद्या पुन्हा चर्चेत आली. याच सिनेमाच्या यशानंतर, २०१२ मध्ये विद्याने प्रसिद्ध निर्माते सिद्धार्थ रॉय कपूर यांच्याशी लग्न केले. मात्र लग्नाच्या १२ वर्षांनंतरही विद्या आज भाड्याच्या घरातच राहते.

विद्या बालन अनेकदा आपल्या घरात रील बनवून सोशल मीडियावर शेअर करते. मात्र, त्या रील्समध्ये दिसणारं घर हे तिचं स्वतःचं नसून भाड्याचं आहे. विद्या बालनने अजूनपर्यंत स्वतःचं घर खरेदी केलेलं नाही, पण आता ती घर घेण्याबाबत विचार करत आहे. सिडनीमध्ये एका कार्यक्रमात बोलताना विद्याने सांगितलं की घर खरेदी करणं हे खूपदा नशिबावर अवलंबून असतं.

विद्या बालन म्हणाली की जेव्हा तिने सिद्धार्थ रॉय कपूरशी लग्न केलं, त्यावेळी ती घर शोधत होती. जवळपास २५ घरं पाहूनही, तिला आणि सिद्धार्थला त्यांना दोघांना पसंत पडेल असं घर मिळालं नाही. नंतर त्यांना एक घर मिळालं, जे दोघांनाही आवडलं, पण ते भाड्याचं होतं.

घर खरेदी करण्याचा विचार डोक्यात ठेवून विद्या आणि सिद्धार्थने बराच काळ घर शोधलं, पण त्यांना काहीच आवडलं नाही. अखेर त्यांनी भाड्याचं घर घेण्याचा निर्णय घेतला. "गर्दीच्या शहरात जवळ बाग असणारं आणि समुद्र खिडकीतून दिसावा असं घर मिळणं कठीण आहे, त्यामुळे आम्ही भाड्याचं घर घेतलं आणि हो आमच्या घरमालकाला चांगले पैसे मिळत आहेत," असं तिने हसत हसत सांगितलं.

## अलफैज ऊर्दू हायस्कुल येथे शालेय मंत्रिमंडळाची निवड



**जळगाव** : अलफैज़ फाउंडेशन संचलित अलफैज़ उर्दू हायस्कूल, अलफैज़ कॅम्पस शिवाजीनगर जळगाव येथे शालेय मंत्रिमंडळ निवडणुक संपन्न झाली. शाळेचे अध्यक्ष माननीय अ. अजीज सालार यांच्या हस्ते मतदानाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना लोकतंत्र्याचे महत्त्व पटवून दिले. तर प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे चेअरमन मुश्ताक सालार, शिक्षण विस्तार अधिकारी खालील शेख, हनीफ शेख, इकबाल तडवी, नाजीम मलिक शाळेचे मुख्याध्यापक जुबेर शेख, खूबचंद सागरमल शाळेच्या मुख्याध्यापिका योगिनी बेंडाळे, एस. एन. चौधरी, वि.डी. पवार, एस. पी. येवले आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक पठाण आसिफ खान यांनी निवडणुकीबद्दल विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. शाळेतील सांस्कृतिक विभाग प्रमुख शेख तौफिक यांनी विद्यार्थ्यांना सहा पॅनल मधून निवडणुका लढण्याची प्रक्रियेचे प्रात्यक्षिक करून दाखवले. इ. पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध पदांसाठी उमेदवारी जाहीर केली होती. ज्यामध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, क्रीडामंत्री, आरोग्य मंत्री, सांस्कृतिक मंत्री, वित्त मंत्री, व हरित सेना मंत्री अशा पदांसाठी उमेदवारी करण्यात आली होती. शाळेच्या विद्यार्थ्यांनी आनंदाने मतदान केले. आणि उमेदवारांनी आपले पॅनल निवडून आणण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मतदान अधिकारी यांची भूमिका शाळेचे शिक्षक आसीम अहमद, तौफीक शेख, शेख नवाब, आयशा खान, शाहीन कुरेशी, मुनव्वर सुलताना, जाहीद खान, शेख वकार, जुबेर अहमद, समरीन शेख, यामिनी निकुंभ, खान जावेरीया, गजाला खाटीक, जमील खान, खिजर खान, अझहर खान, शेख रिजवान, आदींनी मेहनत घेतली.